आजचा सुविचार

वेळ, सत्ता, संपत्ती आणि शरीर

साथ देवो न देवो,

परंतु चांगला स्वभाव आणि चांगले संबंध

कायम आयुष्यभर साथ देतात.

दैनिक अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २२५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.२८ मार्च २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## कुठे पाऊस तर कुठे गारपीट; राज्यात ३०-३१ मार्चला वादळी पावसाचा इशारा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, नागपूर :** राज्यातील हवामानात सध्या लक्षणीय बदल दिसून येत असून येत्या ३० आणि ३१ मार्चदरम्यान मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. विशेषतः दुपारनंतर आभाळ दाटून येत हलका ते अतिदमदार स्वरूपाचा पाऊस, जोरदार वारे आणि काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

३० मार्च...

सध्या राज्यातील अनेक भागांमध्ये अंशतः ढगाळ वातावरण आहे आणि ही परिस्थिती पुढील काही दिवस कायम राहण्याचा अंदाज आहे. कर्नाटक आणि तेलंगणा सीमेलगत असलेल्या मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भातील काही भागांमध्ये या बदलाचा अधिक प्रभाव जाणवू शकतो. ३० मार्च रोजी खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये दुपारनंतर मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. याचबरोबर वादळी वाऱ्यांचा वेग वाढण्याची शक्यता असून विजांचा कडकडाटही होऊ शकतो.

३१ मार्च...

३१ मार्च रोजीदेखील राज्याच्या काही भागांमध्ये या अस्थिर हवामानाचा परिणाम कायम राहण्याचा अंदाज आहे. उर्वरित विदर्भातही हवामानात बदल होऊन ढगाळ वातावरणासह हलका ते मध्यम पाऊस पडू शकतो. काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे नागरिकांनी आणि विशेषतः शेतकऱ्यांनी सतर्क राहण्याची गरज आहे.

शेतकऱ्यांनी सतर्क राहावे

दरम्यान, रब्बी हंगामातील पिकांची काढणी सध्या सुरू असल्याने शेतकऱ्यांसाठी हा काळ अत्यंत महत्त्वाचा आहे. अचानक येणाऱ्या



पावसामुळे काढणी केलेल्या पिकांचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे शेतकऱ्यांनी पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत, तसेच झाकण्यासाठी ताडपत्री किंवा इतर उपाययोजना कराव्यात, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

तसेच वादळी वाऱ्यांपासून आणि संभाव्य गारपीटीपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेणे गरजेचे आहे. हवामानातील बदल लक्षात घेता पुढील काही दिवस हवामानाचा अद्ययावत अंदाज नियमितपणे तपासून शेतीची कामे नियोजनबद्ध करण्याचा सल्ला तज्ज्ञांकडून देण्यात आला आहे. एकूणच, राज्यातील हवामान पुढील दोन दिवस अस्थिर राहण्याची शक्यता असून नागरिकांनीही सतर्क राहण्याचे आव्हान प्रशासनाने केले आहे.

## आरटीई प्रवेशाकरिता ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ

**अक्षराज : जे. के. पोळ**




**दि.२७, ठाणे :** शिक्षणाचा हक्क कायद्या अंतर्गत (आरटीई) खासगी विनाअनुदानित शाळांमधील २५ टक्के राखीव प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत आता दि.३१ मार्च, २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. पालकांना अर्ज सादर करण्यासाठी तसेच आवश्यक दुरुस्ती करण्यासाठी अतिरिक्त वेळ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही मुदतवाढ देण्यात आली आहे. यापूर्वी जाहीर केल्यानुसार, पालकांना ३ ते ५ किलोमीटर अंतरावरील शाळांचे पर्याय निवडण्याची सुविधा कायम ठेवण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या निर्देशानुसार शाळेच्या अंतरासंबंधीची १ किलोमीटरची अट शिथिल करण्यात आल्यामुळे पालकांना अधिक शाळांचे पर्याय उपलब्ध झाले आहेत.

या निर्णयामुळे अधिकाधिक पात्र विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीच्या शाळांमध्ये प्रवेश मिळण्यास मदत होणार आहे. तसेच, ज्या पालकांनी यापूर्वी ऑनलाईन अर्ज सादर केले आहेत, त्यांना अर्जामध्ये आवश्यक दुरुस्ती करण्यासाठी 'अनकन्फर्म' करून पुन्हा 'कन्फर्म' करण्याची सुविधा पोर्टलवर उपलब्ध आहे. याबाबत पालकांना पोर्टलवरील पॉप-अप सूचनांद्वारे माहिती देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद ठाणे बाळासाहेब राक्षे यांनी सांगितले की, आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेत जास्तीत जास्त पात्र विद्यार्थ्यांचा समावेश व्हावा, यासाठी अर्ज भरण्याची मुदत दि.३१ मार्च, २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

पालकांनी या संधीचा लाभ घेऊन अर्ज सादर करावेत तसेच आवश्यक असल्यास दुरुस्ती करून प्रक्रिया पूर्ण करावी. तरी सर्व पात्र पालकांनी मुदतवाढीचा लाभ घेऊन नवीन अर्ज सादर करावेत किंवा पूर्वीच्या अर्जांमध्ये आवश्यक दुरुस्ती करून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी, तसेच ही माहिती अधिकाधिक पालकांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन शिक्षण विभागामार्फत करण्यात आले आहे.

## ठाणे महानगरपालिकेत विविध पदांची मेगा भरती...

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२७, ठाणे :** ठाणे महानगरपालिकेतील रिक्त पदे भरण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या सुशिक्षित बेरोजगारांसाठी एक अत्यंत महत्त्वाची आणि आनंदाची बातमी समोर आली आहे. तांत्रिक अडथळे आणि निवडणुकांच्या आचारसंहितेमुळे गेल्या सहा महिन्यांपासून रेंगाळलेल्या १७७३ पदांच्या भरती प्रक्रियेचा मार्ग अखेर पूर्णपणे मोकळा झाला आहे. येत्या एप्रिल महिन्यापासून या प्रक्रियेला प्रत्यक्ष सुरुवात होण्याचे स्पष्ट संकेत पालिका प्रशासनाकडून मिळाले आहेत.

वास्तविक ठाणे महापालिकेने 'क' आणि 'ड' वर्गातील १७७३ रिक्त पदांसाठी ऑगस्ट २०२५ मध्ये अधिकृत जाहिरात प्रसिद्ध केली होती. मात्र, त्यानंतर लगेचच सार्वत्रिक निवडणुकांची घोषणा झाली. त्यामुळे संपूर्ण राज्यात आचारसंहिता लागू झाली. यामुळे भरती प्रक्रियेला तात्पुरता ब्रेक लागला होता. याशिवाय, आरक्षणाचे काही तांत्रिक मुद्दे आणि रिक्त पदांच्या सुधारित आराखड्यामुळे ही प्रक्रिया तब्बल सहा महिने लांबणीवर पडली होती. आता हे सर्व तांत्रिक पेच सुटले असून पालिका प्रशासनाने भरतीची फाईल पुन्हा एकदा सक्रिय केली आहे.

| परिचारिका (Staff Nurse) | ५५७ |
| --- | --- |
| फायरमन (अग्निशमन) | ३८९ |
| प्रसविका (Midwife) | ११७ |
| चालक यंत्रचालक | २७७ |
| कनिष्ठ अभियंता-२ | ६३ |
| दवाखाना आया | ४८ |
| वॉर्ड बॉय | ३७ |

येत्या एप्रिल महिन्यापासून या प्रक्रियेला प्रत्यक्ष सुरुवात होण्याचे स्पष्ट संकेत पालिका प्रशासनाकडून मिळाले आहेत. या मेगाभरतीमध्ये सर्वाधिक भर हा पालिकेच्या अत्यावश्यक सेवांवर देण्यात आला आहे. यामध्ये मुख्यत्वे खालील विभागांचा समावेश असणार आहे. यात आरोग्य विभागात डॉक्टर्स, परिचारिका, लॅब टेक्निशियन आणि वॉर्ड बॉय यांसारख्या पदांची मोठी संख्या आहे. त्यापाठोपाठ शहराच्या वाढत्या विस्तारानुसार अग्निशमन दलात जवानांची कमतरता भासत होती. त्यामुळे अग्निशमन विभागात भरती केली जाणार आहे. तसेच 'क' वर्गातील लिपिक-टंकलेखक आणि 'ड' वर्गातील शिपाई व सफाई कामगारांची पदे भरली जातील. तसेच कनिष्ठ अभियंता आणि इतर तांत्रिक सहाय्यकांची पदेही यामध्ये समाविष्ट आहेत.

दरम्यान प्राप्त मिळालेल्या माहितीनुसार, ज्या उमेदवारांनी ऑगस्ट २०२५ मध्ये अर्ज केले होते, त्यांच्या अर्जांची छाननी प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात आहे. एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यापासून परीक्षेचे वेळापत्रक जाहीर होण्याची शक्यता आहे. ही परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेतली जाणार आहे. या पारदर्शकतेसाठी नामांकित संस्थेकडे याची जबाबदारी सोपवली जाण्याची चिन्हे आहेत. या भरतीमुळे ठाणे पालिकेच्या रिक्त पदांचा प्रश्न सुटण्यास मदत होईलच, शिवाय आरोग्य आणि आपत्कालीन सेवा अधिक सक्षम होतील. गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या या भरतीला गती मिळाल्याने ठाण्यातील तरुण वर्गात समाधानाचे वातावरण आहे.

## जनगणना २०२७ साठी तीन दिवसीय विशेष प्रशिक्षण शिबिरास उत्साहात सुरुवात



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, बुलडाणा :** जनगणना ही केवळ आकडेवारी गोळा करण्याची प्रक्रिया नसून देशाच्या सर्वांगीण विकासासाठी धोरणे आखण्याचा मूलभूत पाया आहे. त्यामुळे प्रत्येक प्रशिक्षणार्थ्याने नियमावलीचे काटेकोर पालन करत अचूक, पारदर्शक आणि विश्वासार्ह माहिती संकलित करण्यावर भर द्यावा, असे प्रतिपादन प्रधान जनगणना अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले.

जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर, जनगणना संचालनालय व जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय विशेष प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात करण्यात आला, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, सहायक संचालक अजय ठाकूर, सांख्यिकी अन्वेषण विशाल दिवेकर आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी यावेळी नमूद केले की, जनगणना प्रक्रियेत वेळेचे आणि अचूकतेचे विशेष महत्त्व आहे. प्रत्यक्ष क्षेत्रात काम करताना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी प्रशिक्षणार्थ्यांनी इन्स्ट्रक्शन मॅन्युअलचा सखोल अभ्यास करावा आणि आपल्या शंकांचे वेळीच निरसन करून घ्यावे. हे प्रशिक्षण टॉप-टू-बॉटम सर्व घटकांसाठी अत्यंत महत्त्वाचे असून, यामुळे सक्षम आणि जबाबदार मनुष्यबळ तयार होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने आयोजित केलेल्या या विशेष प्रशिक्षण शिबिराला आजपासून उत्साहात सुरुवात झाली आहे. प्रत्यक्ष क्षेत्रात काम करताना येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरणार आहे. या शिबिरातून सक्षम, सजग आणि जबाबदार मनुष्यबळ तयार होऊन आगामी जनगणना अधिक प्रभावीपणे राबविता येईल.

प्रशिक्षणादरम्यान जनगणनेची संपूर्ण प्रक्रिया टप्प्याटप्प्याने समजावून सांगण्यात आली. डिजिटल साधनांचा वापर, मोबाईल ॲपद्वारे माहिती संकलन, डेटा एंट्रीतील अचूकता आणि माहितीची गोपनीयता राखण्याचे नियम यावर विशेष भर देण्यात आला. तसेच प्रत्यक्ष क्षेत्रात येणाऱ्या अडचणी आणि त्यावरील उपाययोजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तज्ज्ञ मार्गदर्शकांनी प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून प्रशिक्षण अधिक प्रभावी केले. प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष सरावाची संधी देण्यात आली. विविध परिस्थितींमध्ये कसे कार्य करावे, याचे मार्गदर्शन करण्यात आले. सहभागींच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

## अशोक खरातसोबतचे हेमंत गोडसे, अतुल सावेंचे फोटो दाखवत सुषमा अंधारे संतापल्या

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२७, नाशिक :** नाशिकमधील बहुचर्चित अशोक खरात प्रकरणावरून ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. आज त्यांनी एसआयटीची भेट घेतली. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी थेट अनेक फोटो सादर करत सत्ताधारी पक्षातील अनेक बड्या नेत्यांवर आरोप केले आहेत. हा भस्मासूर कुणी पोसला आणि त्याला आर्थिक रसद कुणी पुरवली, याची नावे आता उघड झाली पाहिजेत, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

**बिनबुडाचे आरोप करणाऱ्यांनी आधी हे फोटो पाहावेत...**

सत्ताधाऱ्यांकडून होत असलेल्या आरोपांना प्रत्युत्तर देताना अंधारे म्हणाल्या की, काल कुणीतरी एक बोलघेवड्या बाई 'ताज' हॉटेलचे संदर्भ देऊन बिनबुडाचे आरोप करत होत्या. मी आज पुराव्यासकट बोलत आहे. माझ्याकडे असलेले फोटो हे केवळ योगायोग नाहीत. यात अतुल सावे दिसतायत, याचा अर्थ ते गुन्हेगार आहेत असे माझे म्हणणे नाही, पण या प्रकरणाची सखोल चौकशी झाली पाहिजे.

**हेमंत गोडसे आणि एमआयडीसी कनेक्शन...**

सुषमा अंधारे यांनी माजी खासदार हेमंत



गोडसे यांचे काही फोटो माध्यमांना दाखवले. त्या म्हणाल्या, हेमंत गोडसे एका फोटोत भूमिपूजन करताना दिसत आहेत. समोर नारळ आहे आणि त्यांच्यासोबत या प्रकरणातील मुख्य संशयित खरात दिसत आहे. हे भूमिपूजन सिन्नर एमआयडीसीशी संबंधित आहे. जर हे केवळ सामाजिक उपक्रम होते, तर मग तिथे एमआयडीसीचा सर्व स्टाफ काय करत होता? याचे उत्तर आता त्या बोलघेवड्या प्रवक्त्यांनी दिले पाहिजे.

दीपक केसरकरांचीही एसआयटी चौकशी व्हावी...

या प्रकरणात माजी शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांचे नाव घेत अंधारे यांनी खळबळ उडवून दिली. त्यांनी एका बॅनरचा फोटो दाखवत प्रश्न उपस्थित केला की, सिन्नर तालुका औद्योगिक सहकारी वसाहतीचा तो बॅनर आहे. तिथे शालेय शिक्षण मंत्र्यांचे काय काम? शिक्षण खात्याचा संबंध एमआयडीसीशी कसा काय आला? मी यासंदर्भात एसआयटीला पत्र दिले असून केसरकरांची चौकशी करण्याची मागणी केली आहे.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, माझ्या नेत्याबद्दल मी गॅरंटी देते, पण तुम्ही या नेत्यांना कसं प्रोटेक्ट करणार आहात ते सांगा. मी अजून संशोधन करेन आणि या प्रकरणाच्या मुळाशी जाईन. मला नाशिकच नाही, तर इतरही अनेक गोष्टींचे संशोधन करायचे बाकी आहे.

**चाकणकरांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह...**

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्यावरही अंधारे यांनी निशाणा साधला. चाकणकर म्हणतात की त्या केवळ सामाजिक उपक्रमांसाठी भेटत होत्या. पण एका फोटोत कॅबिनेट मंत्री शांत उभे आहेत आणि स्वयंघोषित राज्यमंत्री पदाचा दर्जा लावणाऱ्या बाईंचा सत्कार होतोय, बाजूला खरात उभा आहे. 'ये रिश्ता क्या कहलाता है?' हे आता स्पष्ट व्हायला हवे, असे त्या म्हणाल्या. या सर्व फोटोंचे इनपुट आपण एसआयटीकडे सोपवले असून, या प्रकरणातील 'मास्टरमाइंड' कोण आहे हे समोर आणल्याशिवाय शांत बसणार नाही, असा इशारा यावेळी सुषमा अंधारे यांनी दिला आहे.




## भक्ती की भ्रम?

अशोक खरात या भोंदू बाबाच्या कृष्णकृत्यांच्या एकेक कहाण्या बाहेर येत आहेत. त्या इतक्या लाजिरवाण्या आणि विकृत आहेत की ऐकायलाही आणि पाहायलाही मन धजावत नाही. लोकांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेऊन एखादा माणूस इतका नीचपणा कसा करू शकतो, असा प्रश्न सामान्य जणांना नक्कीच पडतो.

लोक स्वतःच्या प्रापंचिक, व्यावसायिक अडचणींमधून किंवा पापमुक्तीसाठी अशा बाबांच्या वळचणीला लागतात. वर्षानुवर्षे विविध संकटांमधून मार्ग सापडत नाही; अशा वेळी कोणी तरी या अशा भोंदू बाबांचा सल्ला देतो. मग मुंग्यांसारखे एक-एक करून वेगवेगळ्या अपेक्षांनी भक्तगण वाढत जातात. एखाद्याची महत्त्वाकांक्षा इतकी वाढलेली असते की अपेक्षित यश मिळवण्यासाठी ते कोणत्याही थराला जाऊ शकतात. अशा लोकांना जर अघोरी विद्या करणाऱ्या भोंदू बाबांचा पत्ता लागला, तर ते त्यांचे निष्ठावान भक्त बनतात. भोंदू बाबा आपल्या शब्दजाळ्यात अनेक पीडित, अति महत्त्वाकांक्षी आणि अडचणीत सापडलेल्या लोकांना अडकवतात. कोळ्याच्या जाळ्यात अडकलेल्या किड्याप्रमाणे, हे लोक त्यांच्या जाळ्यात अडकतात. त्यांचे आर्थिक, शारीरिक आणि मानसिक शोषण केले जाते. पीडित व्यक्तींना तोंड उघडताही येत नाही; ते मानसिक गुलाम बनतात. खरं तर हे तथाकथित बुवा, बाबा, स्वामी, महाराज, मांत्रिक, देवऋषी, संत-महंत स्वतःच्या तथाकथित दैवी शक्तींचा दिखावा करून लोकांची दिशाभूल करण्याचा धंदा करत असतात. या भोंदू बाबांच्या अन्यायाला सर्वात आधी महिला बळी पडतात. आपल्या समाजात महिलांच्या मानसिक आधारासाठी सक्षम यंत्रणा नसल्याने, त्या अशा बाबांच्या सत्संग, प्रवचन आणि सहवासाचा आधार घेतात. यातून काही वेळा त्यांचे लैंगिक शोषणही होते. आपण कोणत्या तरी समूहाचा भाग आहोत ही भावना माणसाला समाधान देते. मोठ्या भक्तगणामध्ये आपण आहोत, याचा आनंद घेत लोक त्यात गुंतत जातात आणि बाबांचा प्रभाव वाढत जातो. खरे-खोटे, इष्ट-अनिष्ट याचा डोळसपणे विचार करण्याची सवय समाजात कमी असल्यामुळे बुवाबाजीला खतपाणी मिळते.राजकीय व्यक्ती आणि भोंदू बाबा यांच्यातील संबंध समाजाची दशा आणि दिशा बिघडवत आहेत. शिष्य बनून सामाजिक प्रतिष्ठा मिळवणारे राजकारणी आणि त्यांना पाठिंबा देणारे बाबा दोघांचाही फायदा होतो. पैसा, सत्ता, प्रसारमाध्यमे, गुंडगिरी आणि दहशत या सर्व गोष्टी भोंदू बाबांच्या हातात असतात. त्यामुळे त्यांच्या विरोधात आवाज उठवणाऱ्यांची गळचेपी होते. बुवाबाजी रुजण्यामागे दोन महत्त्वाचे आधार आहेत कर्मसिद्धांत आणि चमत्कार. चांगल्या कर्माचे चांगले फळ आणि वाईट कर्माचे वाईट परिणाम हा सिद्धांत मान्य असला तरी, नेमके चांगले आणि वाईट काय याबाबत स्पष्टता नसते. चमत्कार करणाऱ्या व्यक्तीबद्दल लोकांमध्ये आदर, पूज्यभाव आणि श्रेष्ठत्वाची भावना निर्माण होते. विज्ञान शिकलेले लोकही या चमत्कारांपुढे नतमस्तक होतात. प्रार्थना, प्रवचने, गुरुभक्ती आणि पारायण यामधून शिष्यांना संसारातील चिंता विसरण्याचा मार्ग मिळतो. गुरुपरंपरा ही आपल्या संस्कृतीचा महत्त्वाचा भाग असली, तरी भोंदू बाबा तिचा गैरवापर करून स्वतःची प्रतिष्ठा वाढवतात. आपल्या देशातील संतांनी धर्माच्या माध्यमातून मानवतेचा मार्ग दाखवला, कृतिशील आचरणाची शिकवण दिली. पण भोंदू बाबा व्यक्तीपूजेला खतपाणी घालून लोकांना अंधानुकरणाकडे नेतात आणि सत्ताधीशासह एकूण सर्व समाजावर आपला प्रभाव निर्माण करतात. बुवाबाजीला शरण जाणे ही घातक अंधश्रद्धा आहे. यामुळे निर्माण होणारी पैसा, सत्ता आणि दहशतीची साखळी समाजासाठी धोकादायक आहे. राजकारण्यांनी अशा बाबांना शरण जाणे हे लोकशाहीसाठीही घातक आहे.

अशा काळात भारतीय संविधानाने दिलेल्या वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या कर्तव्याची जाणीव समाजाला करून देणे अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकाने शोधक बुद्धी, सुधारणावाद आणि मानवतावाद यांचा स्वीकार केला पाहिजे. बुवाबाजीला शरण जाणे म्हणजे आपल्या घटनात्मक कर्तव्याला तिलांजली देणे होय.

ऐसे कैसे झाले भोंदू,
कर्म करूनी म्हणती साधू।
अंगा लावुनिया राख,
डोळे झाकुनी करतो पाप।
दावी वैराग्याची कळा,
भोगी विषयांचा सोहळा।
तुका म्हणे सांगो किती,
जळो तयांची संगती।।

संत तुकाराम महाराजांनी दिलाला हा इशारा आजही तितकाच लागू आहे. महात्मा फुले यांनीही ‘शेतकऱ्याचा असूड’मधून अशाच भोंदूगिरीवर कठोर प्रहार केला होता.

आज गरज आहे ती अंधश्रद्धेच्या अंधारातून बाहेर पडण्याची, विवेकाच्या प्रकाशात उभे राहण्याची आणि आपली भक्ती ही भक्ती आहे की भ्रम आहे हे पाहण्याची.

**- किशोर जाधव**

# अनुसूचित जातींचे अ,ब,क,ड वर्गीकरण : सामाजिक न्याय की शासनाचे सूक्ष्म षडयंत्र





भारतीय लोकशाहीत ‘सामाजिक न्याय’ हा केवळ शब्द नाही, तर तो संविधानाने दिलेला नैतिक आदेश आहे. पण हा आदेश प्रत्यक्षात किती पाळला जातो? अनुसूचित जातींना दिलेल्या आरक्षणाचा लाभ सर्व घटकांपर्यंत पोहोचतो का, की तो काही मोजक्यांच्याच हातात केंद्रित झाला आहे? या पार्श्वभूमीवर अ, ब, क, ड असे उपवर्गीकरण करण्याचा प्रस्ताव समोर येतो आणि एक अस्वस्थ करणारा प्रश्न उभा राहतो. हे खरोखरच न्यायाचा विस्तार आहे, की समाजातील एकजूट कमकुवत करण्याचा सूक्ष्म राजकीय प्रयोग? अनुसूचित जाती हा एकसंध, समरूपी गट आहे, ही कल्पना वास्तवाशी विसंगत आहे. या वर्गात सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक पातळीवर प्रचंड विषमता आहे. काही जातींनी शिक्षण, नोकरी आणि सत्तेच्या प्रवेशद्वारांवर आपली ठाम छाप निर्माण केली आहे; तर काही जाती अजूनही उपेक्षा, दारिद्र्य आणि संधीअभावी अंधारात चाचपडत आहेत. परिणामी, आरक्षणाचा लाभ काही मर्यादित गटांमध्येच केंद्रीत राहिल्याची टीका केवळ राजकीय नाही, तर सामाजिक वास्तवावर आधारित आहे. या पार्श्वभूमीवर वर्गीकरणाचा विचार पुढे येणे स्वाभाविक आहे.

वर्गीकरणाचे समर्थक एक मूलभूत तत्त्व मांडतात, समानता म्हणजे सर्वांना सारखे देणे नव्हे, तर ज्यांना जास्त गरज आहे त्यांना अधिक देणे. ही भूमिका सामाजिक न्यायाच्या मूळ तत्त्वाशी सुसंगत आहे. कारण आजही काही अनुसूचित जाती शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या मूलभूत संधींपासून वंचित आहेत. अशा परिस्थितीत, जर आरक्षणाचा मोठा वाटा आधीच सक्षम झालेल्या घटकांकडेच गेला, तर उर्वरित घटकांसाठी न्यायाची संकल्पना केवळ कागदावरच उरते. अ, ब, क, ड वर्गीकरणामुळे सर्वात मागासलेल्या घटकांना प्राधान्य मिळू शकते, आरक्षणाचे लाभ अधिक संतुलित रीतीने वाटले जाऊ शकतात आणि सामाजिक समावेशनाला खऱ्या अर्थाने चालना मिळू शकते. म्हणूनच काहींसाठी हे धोरण म्हणजे न्यायाच्या नव्या अध्यायाची सुरुवात आहे.

मात्र, या धोरणाकडे संशयाच्या नजरेने पाहणाऱ्यांची संख्या कमी नाही. त्यांचा सरळ आरोप आहे. हे वर्गीकरण म्हणजे अनुसूचित जातींच्या एकजुटीवर घाला घालण्याचा प्रयत्न आहे. इतिहास साक्षी आहे की, एकजूट असलेला समाज हा राजकीयदृष्ट्या प्रभावी असतो. त्यामुळे त्यात फूट पाडणे हे सत्ताधाऱ्यांसाठी सोयीचे ठरते. अ, ब, क, ड या वर्गीकरणामुळे जातींमध्ये स्पर्धा, असूया आणि संघर्ष वाढण्याची भीती व्यक्त केली जाते. याहून महत्त्वाचे म्हणजे वर्गीकरणाचे निकष कोण ठरवणार? त्यात पारदर्शकता असेल का? आणि सर्वात महत्त्वाचे राजकीय हस्तक्षेप टाळला जाईल का? हे प्रश्न अनुत्तरित राहिल्यास, हे धोरण न्याय नव्हे, तर नियोजित विभाजन ठरू शकते.

या प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयानेही महत्त्वपूर्ण भूमिका मांडली आहे. राज्यांना उपवर्गीकरणाचा अधिकार असला, तरी तो ठोस, वस्तुनिष्ठ आणि वैज्ञानिक आकडेवारीवर आधारित असला पाहिजे, असा स्पष्ट निर्देश न्यायालयाने दिला आहे. घटनेतील कलम १४ आणि १६ यांचा विचार करता, कोणतेही वर्गीकरण हे तर्कसंगत आणि न्याय्य असले पाहिजे. अन्यथा, ते घटनाबाह्य ठरू शकते. यातून एक गोष्ट स्पष्ट होते. भावना, राजकारण आणि घोषणांपेक्षा तथ्य आणि पुरावे अधिक महत्त्वाचे आहेत. या संपूर्ण वादात सर्वात महत्त्वाचा आवाज कोणाचा आहे? तर तो तळागाळातील समाजाचा. अनेक अत्यंत मागासलेल्या जातींना वाटते की, आरक्षणाचा लाभ त्यांच्या दारात कधीच पोहोचला नाही. त्यांच्यासाठी वर्गीकरण म्हणजे पहिल्यांदाच दिसलेली संधी आहे. पण दुसरीकडे, काही प्रगत घटकांना भीती वाटते की, त्यांच्या मेहनतीने मिळवलेल्या संधींवर गदा येईल. त्यामुळे हा संघर्ष केवळ धोरणात्मक नाही; तो अस्तित्व, ओळख आणि स्वाभिमानाचा संघर्ष बनतो.

कोणतेही धोरण त्याच्या उद्देशाने नव्हे, तर अंमलबजावणीने मोजले जाते. जर शासनाने पारदर्शकता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि निष्पक्षता यांचा अवलंब केला, तर हे वर्गीकरण खऱ्या अर्थाने सामाजिक न्यायाचे साधन ठरू शकते. पण जर त्यामागे मतांचे गणित, सत्तेची आकांक्षा आणि समाजात फूट पाडण्याचा हेतू असेल, तर हे धोरण लोकशाहीच्या आत्म्यालाच तडा देणारे ठरेल. या वादातून मार्ग काढण्यासाठी काही ठोस पावले आवश्यक आहेत. सर्वसमावेशक आणि अद्ययावत डेटा संकलन करावे. स्वतंत्र, निष्पक्ष आयोगाची स्थापना करणे. कालबद्ध पुनरावलोकनाची यंत्रणा आणि समाजातील विविध घटकांमध्ये संवाद आणि विश्वास निर्माण करणे. अनुसूचित जातींचे अ, ब, क, ड वर्गीकरण हा केवळ प्रशासकीय निर्णय नाही; तो भारतीय समाजाच्या नैतिकतेची परीक्षा आहे. जर हे धोरण खरोखरच सर्वात वंचित घटकांना न्याय देणार असेल, तर ते नक्कीच स्वागतार्ह आहे. पण जर ते समाजात फूट पाडण्याचे, राजकीय फायद्यासाठी वापरण्याचे साधन ठरणार असेल, तर त्याला ठाम विरोध करणे हीच खरी लोकशाही ठरेल. शेवटी, प्रश्न वर्गीकरणाचा नाही तर तो न्यायाच्या प्रामाणिकतेचा आहे आणि त्या प्रामाणिकतेची परीक्षा आता सरकारसोबतच संपूर्ण समाजालाही द्यावी लागणार आहे.

आज गरज आहे ती घोषणांची नाही, तर प्रामाणिकतेची. जर अ, ब, क, ड वर्गीकरणाच्या माध्यमातून खरोखरच सर्वात वंचित घटकांना न्याय मिळणार असेल, तर त्याचे स्वागत करण्यास कुणालाही हरकत नसावी. पण जर हा प्रयोग समाजातील एकजूट खिळखिळी करून राजकीय फायद्याची पायाभरणी करण्यासाठी रचला गेला असेल, तर तो लोकशाहीसाठी धोक्याची घंटा ठरेल. सत्ताधाऱ्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, वंचितांना न्याय देणे म्हणजे केवळ धोरण आखणे नाही, तर विश्वास निर्माण करणे आहे आणि जर हा विश्वासच ढासळला, तर वर्गीकरणाचे हे गणित केवळ कागदावरच राहील; पण समाजात निर्माण होणारी दरी मात्र पिढ्यानपिढ्या भरून निघणार नाही.

**- प्रविण बागडे**
**नागपूर, ९९२३६२०९१९**

## निरोप

निरोपाच्याभाषणांत
पाळावे  लागते पथ्य
वागाथोडेसे संयमाने
अनावृत्त  नको सत्य

सगुणवर्णन करताना
घुसडे मध्येचं असत्य
द्वयर्थी शब्द चपखल
वापरतात कुणीव्रात्य

न घडलेअनुभव सांगे
असूद्या घटनाअतथ्य
पाहुण्यांस निरोपदेता
कितीकरालं आतिथ्य

परत येतीलं पुन्हा सर
पाहूनि आपले अगत्य
कळत नाहीयं कुणाचे
कोण करतोय सारथ्य

कविताशेर जमवलेले
कुणी पुरवले साहित्य
पडद्याआड झाकलेले
वर्णन सांगता अकथ्य

तपशील मांडे  उत्साहे
काय  केले कृत्याकृत्य
आधी भांड भांडले जे
आता  झाले कृतकृत्य

जिव्हा पूर्ण मुक्त केली
मन माने तसे करे नृत्य
आगळेवेगळे रे भाषण
ही संधी ना मिळे नित्य

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# घटस्फोटांचे वाढते प्रमाण चिंताजनक !

विवाह पृथ्वीतलावर होत असले, तरी जोडीदाराच्या गाठी या स्वर्गातच बांधल्या जातात अशी समजूत भारतीयांत पूर्वापार चालत आली आहे. त्यामुळे घटस्फोट हा शब्द भारतीय शब्दकोशात कुठेही सापडत नाही. विवाह संस्काराच्या माध्यमातून सात जन्माची गाठ बांधली जाते, या संस्कारात देवाब्राह्मणांच्या साक्षीने जन्मभर एकमेकांशी प्रामाणिक राहण्याचे, एकमेकांची काळजी घेण्याचे वचन दिले आणि घेतले जाते. या पवित्र संस्काराने बद्ध झालेले उभयता आयुष्यात येणाऱ्या सुखदुःखाच्या प्रसंगांना नेटाने सामोरे जातात. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर एकमेकांना साथ देत संसाराचे गाडे हाकतात.

गेल्या काही वर्षांत भारतीय तरुणांवर पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव मोठ्या प्रमाणात दिसून येतो. भारतात वाढत जाणारे घटस्फोटांचे प्रमाणही याचीच फलश्रुती आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही, नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हेनुसार भारतात साधारणतः २० वर्षांपूर्वी ०.६% विवाहित महिला घटस्फोटित किंवा विभक्त होत्या, आता हे प्रमाण १% झाले आहे. पुणे स्टडी १९८६-८७ नुसार, घटस्फोटाच्या प्रकरणांपैकी ६७ टक्के खटले पतींनी दाखल केले होते नवीन आकडेवारीनुसार घटस्फोट घेण्यासाठी खटले दाखल करणाऱ्यांमध्ये ५८% महिला आहेत. मुंबई फॅमिली कोर्टाच्या एका अभ्यासानुसार, ४०% प्रकरणांत लग्नानंतर ३ वर्षांतच संबंध दुरावतात. घटस्फोट मागणाऱ्या महिला बऱ्याचदा २५ ते ३४ वयोगटातील असतात. दरवर्षी घटस्फोटांची जेव्हढी प्रकरणे न्यायालयात निकाली काढली जातात, तेव्हढीच किंबहुना त्याहून अधिक नवीन प्रकरणे न्यायालयांत नव्याने प्रविष्ट केली जातात. त्यामुळे येणाऱ्या काळात देशाची कुटुंबव्यवस्था संकटात येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. तरुण पत्नी पत्नी विभक्त झाल्याने सर्वाधिक परिणाम त्यांच्या अपत्यांवर होतात. अशा अपत्यांमध्ये एकलकोंडेपणा, द्वेष, चिडचिड करणे, सूडभावनेने वागणे यांसारखे दोष प्रकर्षाने दिसून येतात. घटस्फोटित पालकांची मुले नकळतपणे गुन्हेगारीकडे वळत असल्याचे निरीक्षणही अहवालात नोंदवण्यात आले आहे. पश्चिमी देशांच्या तुलनेने भारतात होणाऱ्या घटस्फोटांची टक्केवारी कमी असली, तरी आज या प्रकारांवर नियंत्रण आणले नाही, तर भविष्यात ती भीषण स्वरूप धारण करू शकते,ज्याचा परिणाम सामाजिक व्यवस्थेवर होऊ शकतो. विवाह करताना प्रत्येक मुलामुलीने आपल्या भावी आयुष्याबद्दल अनेक स्वप्ने रंगवलेली असतात या स्वप्नांचा चुराडा करणारा घटस्फोट कुणालाही नको असतो; मात्र तो आयुष्यात येण्यामागे कारणेही तितकी गंभीर असू शकतात.

शहरासारख्या ठिकाणी राहणाऱ्या जोडप्यांमध्ये ग्रामीण भागाच्या तुलनेत घटस्फोटांचे प्रमाण अधिक आहे. शहरी भागात राहणारे बहुतांश तरुण पती पत्नी दोघेही नोकरी किंवा व्यवसाय करणारे आणि बऱ्यापैकी धन कमावणारे असतात. कार्यालयात उच्च पदावर असताना इतरांकडून मिळणारा मानसन्मान, सुधारित राहणीमान यामुळे राहणीमानाचा आणि पदाचा काही प्रमाणात अहंकार निर्माण होऊ लागतो. घरी जोडीदाराकडूनही अशाच सन्मानाची अपेक्षा केली जाते. तो तितक्या प्रमाणात न मिळाल्यास लहान सहान प्रसंगांतून खटके उडू लागतात. खटक्यांचे रूपांतर वादात होते. कधी कधी हे वाद विकोपाला पोहोचतात. सातत्याने असे प्रसंग घडू लागल्यास जोडीदारासोबत राहणे नकोसे वाटू लागते. माघार घेण्याची सवय नसल्याने वितुष्ट वाढत जाऊन प्रकरण घटस्फोटापर्यंत पोहोचते. नोकरीच्या निमित्ताने कार्यालयातील सहकारी तसेच कार्यालयाशी संबंधित व्यक्ती यांच्याशी सातत्याने संपर्क येत असल्याने काही वेळा पती किंवा पत्नीचे विवाहबाह्य संबंध निर्माण होतात ज्यामुळे जोडीदारांत वाद होऊन नात्यात भेग निर्माण होते. काहीवेळा विवाहाआधी घडलेले प्रसंग, आजार किंवा जीवनातील एखादी गंभीर घटना याविषयी समोरच्यांशी मोकळेपणाने बोलले जात नाही. या गोष्टी विवाहानंतर लक्षात आल्यावर विश्वासघाताची भावना मनात निर्माण होऊन नात्यातील जवळीकता लोप पावू लागते. ज्याचे पर्यावसान पुढे वादांत आणि भांडणांत होऊन प्रकरण न्यायालयापर्यंत जाते. आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाहांना सरकाकडून प्रोत्साहन आणि संरक्षण दिले जात असले, तरी विवाहानंतर अचानक बदललेले राहणीमान, तेथील चालीरीती, खाण्या पिण्याच्या सवयी यांचा स्वीकार करताना संघर्ष होतो. आंतरधर्मीय विवाह करताना काहीवेळा जोडीदारावर धर्मपरिवर्तन करण्यास सक्ती केली जाते. असे विवाहही फार काळ टिकत नाहीत. याखेरीज पती पत्नींची मानसिक स्थिती, त्यांच्या सवयी, वागण्या बोलण्याच्या पद्धती, परस्परांच्या नातेवाईकांशी असलेली वर्तणूक यासुद्धा काही प्रमाणात घटस्फोटास कारणीभूत ठरू लागल्या आहेत. जोडीदाराला असलेली व्यसने त्याचा मित्रवर्ग यागोष्टीही लग्नाआधी ज्ञात नसल्यास गंभीर वादास कारणीभूत ठरतात.

पतिपत्नीचे नाते बहरण्यासाठी एकमेकांना समजून घेणे, एकमेकांना गुणदोषांसह स्वीकारणे, परस्परांशी मनमोकळेपणाने बोलणे, एकमेकांना प्रोत्साहन देणे, आवश्यक तिथे तडजोड करणे, माघार घेणे, परस्परांमध्ये विश्वासाचे नाते निर्माण करणे या गोष्टी प्राथमिक टप्यावर अत्यंत आवश्यक असतात. आपला अहंकार जपत राहिल्यास लहान सहान प्रकरणात विनाकारण मनात क्लेश निर्माण होऊन नात्यातील प्रेम लोप पावू लागते. आताच्या पिढीवर अनैतिकता पसरवणारे चित्रपट, कुटुंबव्यवस्थेला छेद देणाऱ्या मालिका, वासनांधतेने भरलेल्या वेब सिरीज यांचा प्रभाव अधिक आहे. विवाहसंस्था आणि कुटुंबव्यवस्था यांना तुच्छ लेखनाऱ्या या चित्रपट-मालिकांमध्ये विवाहबाह्य संबंध, गृहकलह, घटस्फोट यांसारखे विषय चवीने चघळले जातात. लिव्ह इन रिलेशिनशिपसारख्या पाश्चिमात्य विकृतीला देशात कायद्याचे संरक्षण असल्याने घटस्फोट घेणे किंवा एक जोडीदार असताना दुसऱ्यासोबत राहणे आजच्या आधुनिक म्हणवणाऱ्या पिढीला तितकेसे चुकीचेही वाटत नाही. भारतीय कुटुंब व्यवस्था टिकवायची असेल, तर या व्यवस्थेचे लाभ महाविद्यालयीन शिक्षणातून शिकवले जायला हवेत त्यासोबतच चित्रपट, मालिका, वेब सीरिज यांतुन भारतीय संस्कृतीला छेद देणारे प्रसंग, कथानक, संवाद यांवर निर्बंध आणणे आज आवश्यक बनू लागले आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

